| | |
|---|---|
| **MHRG020032812022** | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५५/२०२२**<br>**सावित्री महादेव म्हात्रे**<br>**वि.**<br>**लतिका महेंद्र म्हात्रे व इतर** |

## <u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १५५/२०२२ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश</u>

CNR : **MHRG020032812022**

१. प्रस्तुतचा अर्ज, श्रीमती. सावित्री महादेव म्हात्रे यांनी बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार, मयत महेंद्र महादेव म्हात्रे हे अर्जदार यांचा मुलगा, सामनेवाला क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील आहेत. मयत महेंद्र महादेव म्हात्रे हे दिनांक १७/०३/२०१९ रोजी मौजे–बांधण येथे मयत झाले आहेत. मयत महेंद्र महादेव म्हात्रे यांच्या मृत्युपश्च्यात त्यांना अर्जदार आणि सामनेवाला क्र. १ व २ हेच कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त कोणीही कायदेशीर वारसदार नाही. महेंद्र महादेव म्हात्रे यांच्या मृत्यूनंतर शासकीय, निमशासकीय रेकॉर्डला, तसेच इतर ठिकाणी अर्जदार यांचे नाव लावण्याकरिता वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे आवश्यक आहे. म्हणून अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जदार हे मयत महेंद्र महादेव म्हात्रे यांचे वारस असल्याबाबतचा दाखला देण्यास कोणाची हरकत असल्यास ती हरकत या न्यायालयामध्ये एक महिन्यात नोंदविण्याकरिता दिनांक २८/११/२०२४ रोजी 'दैनिक कृषीवल' या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. त्या वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र. १८ वर दाखल केलेली आहे. या शिवाय मौजे

बांधण, पोस्ट पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड या ठिकाणी मयत राहत असलेल्या घराच्या दर्शनी भागावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. अलिबाग येथील दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डावर देखील जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. तसेच मयत इसम राहत असलेल्या घराजवळ व गावातील सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात जाहीर दवंडी देण्यात आली त्याबाबतची दवंडी पावती निशाणी क्र.१० वर आहे. अशा प्रकारे नोटीस प्रसिध्द करून देखील आज अखेर कोणीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज हा विना आव्हानीत राहिला आहे. अर्जदार तर्फे युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. अर्जदार सावित्री महादेव म्हात्रे यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र. १७ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदारांनी मयत महेंद्र महादेव म्हात्रे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. २२ वर दाखल केले आहे. त्यावरून ते दिनांक १७/०३/२०१९ रोजी मरण पावल्याचे स्पष्ट होते.

५. प्रस्तुत प्रकरणात मयत महेंद्र महादेव म्हात्रे यांचे वारस म्हणून इतर कोणीही हरकत घेतलेली नाही. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला हे मयत महेंद्र महादेव म्हात्रे यांचे कायदेशीर वारस असून त्यांना वारस प्रमाणपत्र मिळणे योग्य व न्यायाचे आहे. सदरचे प्रमाणपत्र हे कार्यालयीन कामकाजासाठी देण्यात येत आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. श्रीमती. सावित्री महादेव म्हात्रे, श्रीमती. लतिका महेंद्र म्हात्रे आणि रेश्मीन महेंद्र म्हात्रे हे मयत महेंद्र महादेव म्हात्रे यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरचे प्रमाणपत्र हे कार्यालयीन कामकाजासाठी देण्यात येते.

४. आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर अर्जदारांना प्रमाणपत्र देण्यात यावे.

VARSHA BALVANTRAO PATIL

Digitally signed by VARSHA BALVANTRAO PATIL
Date: 2025.04.30 15:44:47 +0530

ठिकाणः अलिबाग (श्रीमती व्ही. बी. पाटील)

दिनांकः ३०/०४/२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
अलिबाग.